# राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ

" (सेंट्रल प्रोव्हिन्सेस शासन शिक्षण विभागाची अधिसूचना क्रमांक ५१३ दिनांक १ ऑगस्ट, १९२३ द्वारा स्थापित व महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम,२०१६(सन २०१७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ६)द्वारा संचालित राज्य विद्यापीठ)"

(विद्या विभाग)

छत्रपती शिवाजी महाराज प्रशासकीय परिसर, रविन्द्रनाथ टागोर मार्ग, नागपूर – ४४० ००१.

दूरध्वनी क्रमांक: कार्यालय: ०७१२–२५३२०६३ फॅक्स : ०७१२–२५५५७०१


क्र. रातुमनावि/विद्या/१९८२९३

दिनांक ०३ डिसेंबर,२०१९

## : अधिसूचना :

सर्व संबंधितांना सूचित करण्यात येते की, दिनांक ०१ मार्च, २०१९ रोजी संपन्न झालेल्या Mass Communication तदर्थ समितीने **Bachelor of journalism** या एक वर्षीय अभ्यासक्रमात सुधारणा करून सुधारीत अभ्यासक्रमिका सादर केली होती. सदर अभ्यासक्रमिकेस दिनांक ३० मे,२०१९ रोजी विद्याशाखा व दिनाकं १० जुन,२०१९ रोजी विद्यापरिषदेने मान्यता प्रदान केली होती. त्यानुसार सर्व संबधितांच्या माहितीकरिता व पुढिल कार्यवाहिस्तव या बाबत अधिसूचना क्रमांक Acad/Hum&in/2019/108 दिनांक ३ जुलै,२०१९ रोजी निर्गमित करण्यात आली होती. या सुधारित अभ्यासक्रमिकेनुसार अध्यादेश क्रमांक ३/२००९ मध्ये सुधारणा करावयाची असल्याने सदर बाब अध्यादेश व परिनियम कक्षात सादर करण्यात आली होती.

महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ कायदा २०१६ च्या कलम १२(८) अंतर्गत असलेल्या तरतुदिनुसार विद्यापीठाच्या प्रारूप निदेश समितीने दिनांक २२ नोव्हेंबर,२०१९ रोजी अध्यादेश क्रमांक ३/२००९ मध्ये सुधारणा करण्यासंबधी प्रारूप निदेशात किरकोळ सुधारणा सूचवुन नविन प्रारूप निदेश मा.कुलगुरू महोदयांकडे सादर केला होता. यास मा.कुलगुरू महोदयांनी दिनांक १ डिसेंबर,२०१९ रोजी मान्यता प्रदान केलेली आहे. करिता आंतर विद्याशाखीय अभ्यास विद्याशाखेअंतर्गत येणाऱ्या **Bachelor of journalism** या एक वर्षीय अभ्यासक्रमासाठी **निदेश क्रमांक ५३/२०१९ सत्र २०१९–२०२० पासुन पुढे कार्यान्वीत करण्याकरिता, महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ कायदा २०१६ च्या कलम १२(८) अंतर्गत मा.कुलगुरू महोदयांनी निर्गमित केलेला आहे. करिता याप्रमाणे सर्व सबंधीतांनी कार्यवाही घ्यावी ही विनंती.**

(टिप:– **उपरोक्त निदेश विद्यापीठाच्या <u>www.nagpuruniversity.org</u> या संकेत स्थळावर उपलब्ध करण्यात** आलेला आहे.)

मा.कुलगुरूंच्या आदेशानुसार

(डॉ. निरज खटी)
कुलसचिव (officiating)